दिनांक 06/12/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 99

विषय – सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत घोगाव जॅकवेल येथे 300 एच.पी.मोटर्सचे स्टार्टर्स, पॅनेल बोर्ड, मीटर रूम इत्यादी ठेवणेकरीता व तदअनुषंगीक कामे करणेकरीता आर.सी.सी रूमचे बांधकाम करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.(अं.र.रू.41,55,355/-)

संदर्भ- दिनांक 30/11/2022 ने इंजिनियर व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत घोगाव जॅकवेल येथे 300 एच.पी.मोटर्सचे स्टार्टर्स, पॅनेल बोर्ड, मीटर रूम इत्यादी ठेवणेकरीता व तदअनुषंगीक कामे करणेकरीता आर.सी.सी रूमचे बांधकाम करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) रोहित राजकुमार पाटील | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5 % जादा दराने |
| 2) सौरभ पी पवार | अंदाजपत्रकीय दराने |
| 3) शुभम श्रीकांत कोरटे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 % जादा दराने |

उपरोक्त ई निविदापैकी सौरभ पी पवार यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 06/12/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.100

विषय – नगपरिषद हद्दीतील सुर्यनगर, फुलेनगर व एकतानगर येथील कंपोस्ट पीट उभारणेबाबत निर्णय घेणे. (अं.र.रू.4,19,177/-)

संदर्भ- दिनांक 28/11/2022 ने नगर अभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगपरिषद हद्दीतील सुर्यनगर, फुलेनगर व एकतानगर येथे स्वच्छ सर्वेक्षणकामी ओला कचरा विघटन करणेसाठी कंपोस्ट पीट उभारणे आवश्यक आहे. याठिकाणी कंपोस्ट पीट केल्यामुळे कचरा उघडयावरती पडणार नाही. तसेच ओल्या कच-यावरती प्रक्रिया करून खत निर्मिती होणार आहे. त्यामुळे शहराच्या सौदर्यीकरणात भर पडणार असलेने सुर्यनगर, फुलेनगर व एकतानगर येथे कंपोस्ट पीट करणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम नगपरिषद फंडातून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक  06/12/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 101

विषय – नगपरिषद हद्दीतील श्रीरामनगर ओढा, डॉ. कॉलनी गार्डन, मंडले वस्ती पाझर तलाव, सुळकाई रोड येथे परकोलेशन पीट बांधणेकामी निर्णय घेणे.(अं.र.रू.4,64,972/-)

संदर्भ- दिनांक 28/11/2022 ने नगर अभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगपरिषद हद्दीतील स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अंतर्गत श्रीरामनगर ओढा, डॉ. कॉलनी गार्डन, मंडले वस्ती पाझर तलाव, सुळकाई रोड येथे परकोलेशन पीट बांधणे आवश्यक आहे. माझी वसुंधरा  अभियान अंतर्गत जल घटकासाठी सदर ठिकाणी परकोलेशन पीट केल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. तसेच शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार असलेने श्रीरामनगर ओढा, डॉ. कॉलनी गार्डन, मंडले वस्ती पाझर तलाव, सुळकाई रोड येथे परकोलेशन पीट बांधणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम नगपरिषद फंडातून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 06/12/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.102

विषय – सन 2022-2023 या वित्तीय वर्षाकरीता वाहन विभागाकडील वाहनांसाठी नवीन टायर टयुब पुरवठा करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 01/11/2022 ने वाहन विभाग प्रमुख व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

सन सन 2022-2023 या वित्तीय वर्षाकरीता वाहन विभागाकडील वाहनांसाठी नवीन टायर टयुब पुरवठा करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) शुभम श्रीकांत कोरटे
2) सुहेल सलिम तांबोळी
3) श्रीगणेश एंटरप्रायझेस

उपरोक्त ई निविदापैकी श्रीगणेश एंटरप्रायझेस यांचे आयटम क्रं.1.01, 1.03, 1.04, 1.05, 1.09, 1.13, 1.15, 1.17 मधील निविदेतील दर सर्वात कमी आहेत. तसेच सुहेल सलिम तांबोळी यांचे आयटम क्रं.1.07 व 1.11 मधील निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराच्या दोन निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा